प्रति,

मा.पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य मुंबई.

जा.क्र.:- पोअधी/तां.सेवा./गुअवि/३४६/२०२० पुणे, दिनांक १२/११/२०२०

विषय :- माहे ऑक्टोबर २०२० मधील श्वान पथकाचे उल्लेखनीय कामगिरीबाबत...

**********

उपरोक्त विषयास अनुसरून सविनय सादर की, माहे ऑक्टोबर २०२० मधील श्वान पथकाची उल्लेखनीय कामगिरी खालील प्रमाणे आहे.

१) भिगवण पो. स्टे. जिल्हा पुणे ग्रामीण येथील गु. र. नं. ३८७/ २०२० भा. द. वि. कलम ३९५ हा गुन्हा दि.१०/१०/२०२० रोजी दाखल असून गुन्हयाचे ठिकाण डाळज नं. १ पुणे-सोलापुर हायवेवर फिर्यादी गाडीची पंक्चर काढत असताना सुमारे ४ ते ५ संशयीत आरोपींनी फिर्यादीच्या अंगावरील व गाडीतील इतर लोकांचे सामान बॅगा (एकूण १,२५,०००/- रूपये किंमतीचे दागिने व रोख व बॅगा) घेवून पळाले. सदर गुन्हयाचे तपासकामी श्वान पथकास पाचारण केले असता सीबा (डॉबरमन) व श्वान हस्तक १) पो.ना.४४३ जी.बी.फापाळे, २) पो.शि.२६२४ बी.एस.चौधरी यांनी सदर गुन्हयामध्ये घटनास्थळावर मिळून आलेल्या कापडाच्या तुकडयाचा वास श्वान सिबा हीस दिला असता श्वान अर्धा किलोमिटर अंतरावर जावून गवताच्या झुडपामध्ये फिर्यादीच्या ०४ बॅगा व मोबाईल शोधून काढले व तेथुन पुढे ०४ किमी अंतरावर खडी मशील (वायाळ वस्ती) या ठिकाणी जावून तपासाच्या अनुशंगाने योग्य मार्ग दाखविला.

अशा प्रकारे श्वान पथक पुणे ग्रामीण येथील श्वान सिबा व तिचे हस्तक १) पो.ना.४४३ जी.बी.फापाळे, २) पो.शि.२६२४ बी.एस.चौधरी यांनी सदर गुन्हा उघडकीस येण्याचे दृष्टीने अचुक भुमिका बजावली असून तपास कार्यामध्ये मदत केली आहे.

२) हवेली पो.स्टे. जिल्हा पुणे ग्रामीण येथील गु.र.नं.२६९/२०२० भा.द.वि. कलम ३०२, ३४ सह अनु.जाती जमाती अत्या. नियंत्रण कायदा कलम ३ (२) (व्ही) १९८९ चे कलम ६. हा गुन्हा दि.१८/१०/२०२० रोजी दाखल असून सदर गुन्हयाचे तपासकामी श्वान पथकास पाचारण केले असता सीबा (डॉबरमन) व श्वान हस्तक १) पो.ना.४४३ जी.बी.फापाळे, २) पो.शि.२६२४ बी.एस.चौधरी यांनी सदर गुन्हयामध्ये घटनास्थळावरील मिळून आलेल्या काळया रंगाच्या चप्पलचा वास श्वान सिबा हिस दिला असता श्वान घटनास्थळी फिरून बाजूच्या बिल्डींगच्या जिन्याने वरती जावून आजुबाजूच्या रूमचा वास घेवून टेरेसवरती कबुतरांच्या ढाबळीजवळ थांबले व तेथून पुन्हा खाली बॉडी पडलेल्या ठिकाणी येवून थांबले सदर गुन्हयामध्ये संशयीत आरोपी सुमीत गंगाधर शेजवळ यास अटक केली. त्याने व त्याच्या मित्राने खुन (गुन्हा) केल्याबाबत सांगीतले. तसेच सुमित शेजवळ हा गुन्हा घडले ठिकाणीच राहत असल्याचे समजले.

सदर गुन्हयाच्या ठिकाणी श्वानाने घटनास्थळापासून टेरेसपर्यंतचा मार्ग बरोबर दाखवला त्यामुळे गुन्हा उघडकीस आणण्यास मदत झाली.

३) इस्लामपुर पो.स्टे. जिल्हा सांगली येथील गु.र.नं. ७५२/२०२० भा.द.वि. कलम ३०२, ५०४, ५०६, ३४. हा दि.३०/१०/२०२० रोजी दाखल असून असून सदर गुन्हयाचे तपासकामी श्वान पथकास पाचारण केले असता इस्लामपुर पोलीस ठाण्याचे पो.नि./श्री. देशमुख यांनी केलेल्या निर्देशाप्रमाणे श्वान हस्तक १.पो.ना.१३८४ एस.बी.कामत २.पो.हवा.एस.बी.सनदी यांनी संशयीत आरोपीची संशयीत स्लिपरचा वास श्वान तेजा (डॉबरमन) यास दिला, श्वान तेजा हा सदर घटनास्थळापासून पश्चिमेस अंदाजे २०० ते २५० मी.

Scanned with CamScanner

उरूणवाडी-इस्लामपुर डांबरी रोडने जावुन सांगली इस्लामपुर रोडवर मायाक्का मंदीराजवळील चौकात येवुन थांबला असा माग काढून श्वान तेजा याने गुन्हयामध्ये महत्वाचे मार्गदर्शन केले आहे. त्या आधारे पोलीसांनी तपास करून सदर गुन्हयातील आरोपींना अटक करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे. सदर गुन्हयामध्ये दाखविलेल्या मागामध्ये या गुन्हयातील संशयीत आरोपींनी सदर गुन्हयाचा कट केलेचे तपासामध्ये उघडकीस आले आहे.

४) रहिमतपुर पो. स्टे. गु.र.नं. १३५/२०२० भा.द.वि. कलम ४५७, ३८० हा गुन्हा दि.१९/१०/२०२० रोजी दाखल असून सदर गुन्हयाचे तपासकामी श्वान पथकास पाचारण केले. स.पो.नि. बल्लाळ यांनी निर्देशीत केल्याप्रमाणे श्वान हस्तक १.पो.हवा.११ मोरे २. पो.कॉ.१२४३ व्ही.एस.जाधव यांनी घटनास्थळा वरील आरोपीने हाताळलेली संशयीत एक लाल, चॉकलेटी, काळी पट्टी व पिवळी काट असलेल्या गोधडीचा वास श्वान रिओ (डॉबरमन) यास दिला. श्वान रिओ पतसंस्थेच्या पाय-या चढून पतसंस्थेमध्ये जावून घटनास्थळी फिरून पतसंस्थेच्या पश्चिमाभिमुख मुख्य दरवाजाधून बाहेर येवून पतसंस्थेसमोरील डाबंरी रस्त्यावर येवून दक्षिण बाजूस २५ ते ३० मीटर अंतरावर डांबरी रस्त्याचे लगत डाव्या बाजूला नाल्याशेजारी झुडपात थांबला. तेथे संशयीत लोखंडी कटावणी मिळून आली. पुन्हा संशयीत गोधडीचा वास श्वानास दिला असता श्वान लगतचे डांबरी रस्त्याबर येवून दक्षिणेस पुढे अंदाजे ८० ते १०० मीटर अंतरावर साप एस.टी. स्टॅन्ड चौकात येवून उजव्या बाजूस पश्चिमेस वळून साप ते रहिमतपुर जाणा-या रस्त्याने शाळेसमोरून अंदाजे १०० ते १२० मीटर अंतर जावून महाविर मारूती कांबळे याचे घराजवळ डाव्या बाजूस दक्षिणेस वळून पोपट कांबळे याचे घरा शेजारून अंदाजे २० ते २५ मी. अंतर सरळ पुढे जावून एका घरासमोरील मोकळया जागेत फिरून त्या घराचे लाकडी बंद असलेल्या दरवाजाजवळ थांबला. सदर ठिकाणी पुन्हा संशयीत गोधडीचा वास दिला असता श्वान आरोपी नामे सचिन वाघमारे याच्या घराचे मुख्य दरावाजाजवळ थांबला व गुन्हा उघडकीस आणण्यास मदत झाली.

५) इंदीरानगर, पो.स्टे. जिल्हा नाशिक शहर, गु.र.नं. २९२/२०२० भा.द.वि. कलम ३०२ हा गुन्हा दि.२४/१०/२०२० रोजी दाखल असून सदर गुन्हयाचे तपासकामी श्वान पथकास पाचारण केले असता श्वान हस्तक १.पोलीस अंमलदार ६२५चव्हाण २.पोलीस अंमलदार ७८ कोंडे यांनी घटनास्थळावरील लाल रंगाचा कपडा व ओढणी सारखा कपडयाचा वास श्वान गुगल (डॉबरमन) यास दिला. श्वान वास घेत घरात इमारत्र फिरून मुख्य रस्त्याने बाहेर आला व इमारतीच्या जिन्याने वरती जावून परत खाली आला व घटनास्थळाच्या रूममध्ये शिरला तिथे पाच सहा साध्या वेषातील कर्मचारी व संशयीत इसम उभा होता. श्वानाने प्रत्येक इसमाचा वास घेवुन संशयीत इसमाच्या अंगावर उडी मारून भुंकला व थांबला व गुन्हा उघडकीस आणण्यास मदत झाली.

६) कास पो.स्टे. जिल्हा ठाणे ग्रामीण, गु.र.नं. १६४/२०२० भा.द.वि. कलम ३९४, ३९७, आर्म ॲक्ट कलम ३, २५. हा गुन्हा दि.०१/१०/२०२० रोजी दाखल असून सदर गुन्हयाचे तपासकामी श्वान पथकास पाचारण केले असता श्वान हस्तक १.पो.हवा. २४८२ आर.बी.गवळी २.पो.हवा.२६६६ एस.के.डीके यांनी तपासी अंमलदार सपोनि सिध्दवा जॉयभाये यांचे मार्गदशनाखाली गुन्हयामध्ये घटनास्थळावर आरोपीने गुन्हा करताना वापरलेली हयुंदाई ग्रॅन्ड आय १० ही कार मिळून आली. सदर कारचे ड्रायव्हर सीटवर निळया रंगाचा फाटलेल्या स्थितीतील फुल शर्ट व लाल रंगाची चामडी बॅग, गडद रंगाचा हिरवा फुल शर्ट व इतर कपडे मिळून आले. सदर कपडयांचा वास श्वान बेली हिस देवुन पोलीस ठाणे स्टाफने पकडून आणलेले ३ संशयीत आरोपींची ओळखपरेड घेतली असता तीन वेगवेगळया वेळी तीन इसम नामे १.देवेंद्र चौधरी २.सुबोधकुमार यादव ३.रविकुमार सोलंकी यांना दाखविले व सदर गुन्हा उघडकीस आणण्यास मदत झाली.

Scanned with CamScanner

७) साक्री, पो.स्टे. जिल्हा धुळे, गु.र.नं.११३/२०२० भा.द.वि.कलम ४५४, ३८० हा गुन्हा दि.०७/०८/२०२० रोजी दाखल असून सदर गुन्हयाचे तपासकामी श्वान पथकास पाचारण केले असता श्वान हस्तक १.पो.हवा.११०९ आर.जे.जाधव २.पो.ना.८५९ के.एस.परदेशी यांनी सदर गुन्हयामध्ये घटनास्थळावरील चोरटयाने हाताळलेले कपाटाचे ड्रॉप व लोखंडी सांडसी चा वास श्वान विरू यास दिला. श्वान विरू हा सदर वासावरून किचन रूममध्ये फिरून घराचे मुख्य दरवाजातुन बाहेर निघाला व घरासमोरील खानदेश गांधी विदयालयाचे समोरील रस्त्याने मार्ग काढीत कासारे बस स्टँड चौका जवळील छाईल प्रतापुर रस्त्यापर्यंत उपयुक्त मार्ग काढला. त्यावरून पुढील तपास करून दि.२१/१०/२०२० रोजी सदर गुन्हा उघडकीस आणण्यास मदत झाली. सदर गुन्हा हा दि.२२/१०/२०२० रोजी उघडीकीस आला.

८) अनसिंग पो.स्टे. जिल्हा वाशिम, गु.र.नं. २८७/२०२० भा.द.वि. कलम ३०२, २०१, ३४ हा गुन्हा दि.१२/१०/२०२० रोजी दाखल असून सदर गुन्हयाचे तपासकामी श्वान पथकास पाचारण केले असता श्वान हस्तक पोसई एस.के.लाड पो.हवा.१०८ एस.एस.शेजूळकर घटनास्थळावरील चार्जीग बॅटरी व गोलाकार दगडाचा वास श्वान लुसी (डॉबरमन) हिस दिला असता श्वान लुसी हिने संशयीत आरोपी नामे नामदेव हरी उगले याचे घर दाखविले व सदर गुन्हा उघडकीस आणण्यास मदत झाली.

९) वाशिम ग्रामीण पो.स्टे. गु.र.नं.५०३/२०२० भा.द.वि. कलम ३०२ हा गुन्हा दि.२४/१०/२०२० रोजी दाखल असून सदर गुन्हयाचे तपासकामी श्वान पथकास पाचारण केले असता पोसई एस.के.लाड, पो.हवा.१०८ एस.एस.शेजूळकर यांनी एसडीपीओ श्री मंगरूळपीर केंगळे व तपासी अधिकारी यांना रिपोर्ट करून गुन्हयामध्ये घटनास्थळावरील बांगडी व पांढरी दोरीचा मिळून आले. बांगडीचा वास श्वान लुसी हिस दिला असता श्वान लुसी हिने सदर वासावरून घटनास्थळावरून मार्ग काढून घराच्या मागील दरवाजाने घरामध्ये प्रवेश करून घरामध्ये फिरून महिला नामे सौ.सुनिता प्रदीप हजारे हिच्या जवळ जावून थांबून भुंकून झेप घेतली. तसेच दोरीच्या वासावरून घरातील एकच महिला नामे सौ.सुनिता प्रदीप हजारे हिस ओळखले व सदर गुन्हा उघडकीस आणण्यास मदत झाली.

अशा प्रकारे खुनाचे ५, दरोडा १, जबरी चोरी १, घरफोडी २ असे एकंदरीत (९) गुन्हे श्वान पथकाचे मार्फतीने उघडकीस आले आहेत. करिता माहितीस्तव सविनय सादर.

(अतुलचंद्र कुलकर्णी)
अपर पोलीस महासंचालक
राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य पुणे.

Scanned with CamScanner


RR.390

